**शिक्षणाधिकारी कार्यालय**

(प्राथमिक विभाग )

चेलीपुरा हायस्कूल स्टेशन रोड, औरंगाबाद 431001


जा.क्र.जिपऔ/शिक्षण/कावि/प्रावि-3/2022-23/2484/1750 दिनांक :- 27.03.2023

**UDISE NO :- 27190605305**

**वाचा** :-1. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.प्राशाअ/2021/प्र.क्र.17/एसएम-4 दिनांक 15 फेब्रुवारी 2021

2. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.माशाअ-2022/प्र.क्र.275/एसएम-4 दिनांक 06 फेब्रुवारी 2023
3. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र शिसंमा-2023 (एस-7)/अनुदान/माध्य-ब/1053 दिनांक 21.02.2023
4. मा.शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.शिउसं/औ/मावि-1/अनुदान/2022-23/1900 दिनांक 24 फेब्रुवारी 2023
5. मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक माशाअ-2022/प्र.क्र.275/एसएम-4 दिनांक 23 फेब्रुवारी 2023
6. मुख्याध्यापक, यांनी सादर केलेला प्रस्ताव.
7. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शुध्दीपत्रक क्र.प्राशाअ-2021/प्र.क्र.17/एसएम-4 दिनांक 7.5.2021
8. या कार्यालयाचे आदेश क्र. जिपऔ/शिक्षण/प्रावि-3/2022-23/2484/1750 दिनांक 27.03.2023

**दुरुस्ती आदेश** :-

"कायम" विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व "कायम" शब्द वगळलेल्या (इंग्रजी माध्यम व्यतिरिक्त) त्रुटी पुर्तता केलेल्या शाळांना अनुदान मंजुर करणे, यापुर्वी अशंत: अनुदान घेत असलेल्या शाळा तुकडयांना वाढीव अनुदानाचा टप्पा व अघोषीत असलेल्या प्राथमिक शाळा/वर्ग/तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करुन अनुदान मंजुर करणे बाबत संदर्भ क्रमांक 1 चे शासन निर्णयान्वये कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक 3 व 4 चे पत्रानुसार शासन निर्णय दिनांक 15.02.2021 अन्वये कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व कायम शब्द वगळलेल्या (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त) त्रुटी पुर्तता केलेल्या शाळांना अनुदान मंजुर करणे, यापुर्वी अशंत: अनुदान घेत असलेल्या शाळा/तुकडयांना वाढीव अनुदानाचा टप्पा व अघोषित असलेल्या खाजगी माध्यमिक शाळा/वर्ग/तुकडयांना अनुदानास पात्र करुन शासन स्तरावरुन अनुदान विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात आले आहे.

संदर्भ क्रमांक 5 चे शासन पत्रान्वये शा.नि.दिनांक 12, 15 व 24 फेब्रुवारी 2021 अन्वये त्रुटीमुळे अपात्र असलेल्या शाळांपैकी त्रुटीपुर्तता केलेल्या घोषित प्राथमिक शाळा/वर्ग/तुकडयांना अनुदान मंजुर करण्यास विहित अटी व शर्तीस अनुसरुन मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील संदर्भिय शासन निर्णयानुसार अनुदान मंजुर केलेल्या प्राथमिक शाळा/वर्ग/तुकडी मधील शिक्षकांना दिनांक 1 जानेवारी, 2023 पासुन प्रत्यक्ष वेतन अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

संदर्भ क्रमांक 1 चे शासन निर्णयातील अटी/शर्तीच्या अधिन राहुन मुख्याध्यापक यांनी त्यांचे संदर्भ क्रमांक 6 अन्वये शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करित असल्याचे हमीपत्र सादर केले आहे.

वरील बाबी विचारात घेवून या आदेशाव्दारे शासनाने वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयात नमुद पदसंख्येपैकी सन 2022-23 च्या संच मान्यतेत मंजुर असलेल्या शिक्षकांना दिनांक 01 जानेवारी 2023 पासून आपल्या शाळेच्या नावासमोर खालील प्रमाणे नमुद केलेले व यापुर्वी 40 टक्के अनुदान सुरु असलेले वर्ग/तुकडी व त्यावरील अंतिम अनुदानास पात्र पदे वाढीव 20 टक्के अनुदानासाठी पात्र आहेत.

| अ.क्र. | संस्था व शाळेचे नांव | घोषीत वर्ग/तुकडी | यापुर्वी सुरु असलेल्या अनुदानाचा टप्पा | **60 टक्के अनुदानास पात्र पदे** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ शासन निर्णयातील पदे व शासन शुध्दीपत्र नुसार | सन 2022-23 च्या संच मान्यतेनुसार मंजुर पदे | अंतिम अनुदानास पात्र पदे |
| 1 | इंद्रगढी प्राथमिक शाळा, घाटनांद्रा, ता.सिल्लोड जि.औरंगाबाद | इ. 1 ली ते 5 वी दुसरी तुकडी | 40 टक्के | 5 | 13 | 5 |

मुख्याध्यापक यांनी सन 2022-23 च्या संच मान्यतेत मंजुर पदावर कार्यरत असलेल्या शिक्षकांचे शालार्थ प्रणालीतुन वेतन अदा करावे.

**(जयश्री चव्हाण)**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद औरंगाबाद

**प्रतिलिपी :-**

1. मा. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
2. अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (प्राथमिक) औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन अदा होईल याची दक्षता घ्यावी.
3. मुख्याध्यापक इंद्रगढी प्राथमिक शाळा, घाटनांद्रा, ता.सिल्लोड जि.औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, आपल्या शाळेतील शिक्षकांचे वेतन देयके अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक) औरंगाबाद कार्यालयास सादर करावीत.